


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२१ ●सोमवार,दि.१० नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# नाव राधाकृष्ण, कृत्य कंसाची औलादीचं !

## वाहन फोडणाऱ्याला बक्षीस; मंत्री विखेंवर बच्चू कडूंचा 'प्रहार'

**बीड । प्रतिनिधी**

भाजप मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर वादग्रस्त विधानावर प्रहारचे बच्चू कडू यांनी जोरदार हल्ला चढवला आहे. 'नाव राधाकृष्ण, कृत्य मात्र कंसाचं करायची असेल तर, कंसाची ही औलाद मुख्यमंत्र्यांनी हाकलून लावली पाहिजे, असा संताप व्यक्त करताच, या अवलादीच वाहन फोडणाऱ्याला एक लाख रुपयाचं बक्षीस माझ्याकडून मिळेल,' अशी घोषणा बच्चू कडू यांनी केली. भाजप मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या वादग्रस्त विधानावर बच्चू कडू चांगलेच संतापले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील या विधाचा समाचार घेताना, सरकारने मंत्री विखे पाटील यांच्या कारखान्याला किती कर्जमाफ केलं, असा प्रश्न केला. यानंतर बच्चू कडू यांनी मंत्री विखे पाटलांवर त्यांच्या विधानावरून जोरदार हल्ला चढवला. बच्चू कडू यांनी राधाकृष्ण विखे पाटलांची गाडी फोडेल, त्याला एक लाख रुपयांचे माझ्याकडून बक्षीस दिले जाईल, अशी थेट घोषणा केली. ते म्हणाले, नाव राधाकृष्ण, कृत्य मात्र कंसाचं करायची असेल तर, कंसाची ही औलाद मुख्यमंत्र्यांनी हाकलून लावली पाहिजे. फडवणीससाहेब कर्जमाफीची घोषणा करत आहेत. तर हे वाचाळवीर मंत्री आहे, अशी विधानं करत आहेत.



**● मंत्री विखेंचं विधान काय होतं**

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत वादग्रस्त विधान केले होते. ते म्हणाले होते की, उद्याचे भविष्य आमच्या तरुणांसाठी आहे. आमचे गेले आता. सोसायटी आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका लढून थकलो आम्ही. सोसायटी काढायची, कर्जबाजारी व्हायचे आणि पुन्हा मग कर्जमाफीची मागणी करायची.**

## महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ

### बीडचा बाहुबली नेता अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाणार!

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या घोषणेनंतर राज्यभरात आता मोठ्या घडामोडी घडत आहेत. अनेक नेते, कार्यकर्ते सोईच्या पक्षात उडी घेताना दिसत आहेत. विशेष म्हणजे यात काही माजी आमदार, मंत्र्यांचाही सम ावेश आहे. याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता बीड जिल्ह्यात राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. येथे एका बड्या नेत्याने आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. या नेत्याच्या निर्णयाम ुळे आष्टी विधानसभा मतदारसंघ तसेच बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलेच बदलणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार आष्टी मतदारसंघात २० वर्ष विधानसभेचे नेतृत्व करणारे माजी आमदार भीमराव धोंडे मंगळवारी म्हणजेच ११ नोव्हेंबर रोजी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादी पक्षातील प्रवेश निश्चित झाल्यानंतर अजितदादांचे नेतृत्व हे विकसनशील आहे, खंबीर आहे, अशी स्तुतीसुमने भीमराव धोंडे यांनी उधळली आहेत. तसेच दादांचा वादा पक्का आहे. ते दिलेला शब्द पाळतात, असे म्हणत भविष्यात मोठी जबाबदारी मि ळण्याचेही संकेत धोंडे यांनी दिले आहेत. येत्या ११ नोव्हेंबर रोजी ते शेकडो कार्यकर्त्यांसोबत अजित

▶▶ उर्वरित पान २ वर

### न.प.निवडणुकीत आधी ओबीसींना प्राधान्य अन्यथा मगच! – शरद पवार



**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीत नगरपरिषद निवडणुकीत मूळ ओबीसींना प्रथम प्राधान्य देऊन नंतरच कुणबी प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवाराचा विचार करावा असे स्पष्ट आदेश शरद पवार यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे ओबीसी

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यातील वक्फच्या सर्व मस्जिद, दरगाह, कब्रस्तानची ५ डिसेंबर पयरत उम्मीद पोर्टलवर १०० टक्के नोंदणी करावी

### ना.समीर काझी यांचे आवाहन; हयगय करू नका, गाफिल राहू नका आजच नोंदणी करा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व वक्फ अंतर्गत रजिस्ट्रर्ड असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान यांनी दि.५ डिसेंबर २०२५ पयरत 'उम्मीद पोर्टल' वर नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी केले आहे. उम्मीद पोर्टलवर सर्व कागदपत्रांची नोंद होणे हे अतिशय आवश्यक आणि सुरक्षित आहे. त्यामुळे

▶▶ उर्वरित पान २ वर



**तेरा जणांची अशासकीय समिती नेमली; एनजीओ यांनी सेंटर सुरु करण्यासाठी पुढे यावे–समीर काझी**

**राज्यातील वक्फ अंतर्गत रजिस्ट्रर्ड असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान, मदरसा यांची उम्मीद पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी वक्फ बोर्डाच्या वतीने १३ जणांची अशासकीय समिती नेमण्यात आली आहे. त्यामध्ये जमीयत अर्शद मदनी ग्रुपचे २, जमीयत महेमूद मदनी ग्रुपचे २, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे २, तबलिग जमातचे २, काझी सेवा संघ २, बरेलीवाले २ आणि वक्फ बोर्डाचे १ नोडल अधिकारी अशा १३ सदस्यांचा समावेश असणार आहे.ही समिती नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन करणार असून कागदपत्रासंबंधी अडचणी दूर करण्यासाठी देखील प्रयत्न करणार आहे. त्याच बरोबर बीड जिल्ह्यासह राज्यातील समाजसेवा संस्थानी (NGO) नोंदणीच्या कामाला गती देण्यासाठी स्वत... हून पुढाकार घेत उम्मिद पोर्टल सेंटर सुरू करावे. त्याठिकाणी संगणकावर काम करणाऱ्या मुलांना राज्य वक्फ बोर्ड मानधन देईल असे समीर काझी यांनी सांगितले आहे.**

## स्वहितापेक्षा शेतकर्यांचे हित महत्त्वाचे: आ.संदीप क्षीरसागर

### गजानन सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा संत–महंतांच्या हस्ते शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

गजानन सहकारी साखर कारखान्याच्या, सन २०२५-२६ चा मोळीपूजन आणि गळीत हंगामाचा रविवारी (दि.९) रोजी शुभारंभ झाला. यावेळी, स्वहितापेक्षा शेतकऱ्यांचे हित साधणे महत्वाचे असून हाच विचार डोळ्यांसमोर ठेवून १० वर्षांपासून बंद असलेला गजानन सहकारी साखर कारखाना अथक प्रयत्नांनी सुरू केला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी मी आणि गजानन साखर कारखाना कायम कटिबद्ध असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.



श्री. गजानन सहकारी साखर कारखानाच्या मोळीपूजन व गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी (दि.९) रोजी संत-महंतांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडला. याप्रसंगी श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, मंगलमूर्ती देवस्थान येथील ह.भ.प.

▶▶ उर्वरित पान २ वर

## न.प.निवडणूक: राष्ट्रवादीतून उमेदवारी मिळावी यासाठी मुलाखतीला इच्छुकांची तोबा गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात रविवारी (दि.९) नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी दोनशेहून अधिक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या मुलाखती रात्री उशिरापर्यंत सुरूच होत्या. पक्षाला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद आगामी निवडणुकीत पक्षाची ताकद दाखवणारा ठरला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर विशेष लक्ष असणार आहे. नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पक्षाच्या मुलाखत मंडळात जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, राज्य प्रवक्ते भागवत तावरे, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, शहराध्यक्ष अमर नाईकवाडे,

▶ उर्वरित पान २ वर

### बसमध्ये चढताना महिलेचे मणीमंगळसुत्र लांबविले

**केज । प्रतिनिधी**

अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत बसमध्ये चढत असलेल्या महिलेचे मणीमंगळसुत्र लांबविल्याची घटना केज येथील बसस्थानकावर घडली. तांबवा (ता. केज) येथील मीरा शिवाजी चाटे या मुलीला दवाखान्यात घेऊन अंबाजोगाईला निघाल्या होत्या. ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता येथील बसस्थानकातून अंबाजोगाईकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन

▶▶ उर्वरित पान २ वर

## जनतेचा नेता, हक्काचा माणूस म्हणून विनोद आप्पा इंगोले यांची ओळख !

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मित्रनगर, विद्यानगर पश्चिम परिसरातील प्रभाग क्रमांक १५ मध्ये सौ.वनिता विनोद इंगोले विद्यानगर पश्चिम मधून निवडणूक लढवावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेनी केली आहे. कारण नेतृत्व आणि दातृत्वाचा सुंदर संगम असलेल्या इंगोले कुटुंबीय यांनी आपल्या कार्यातून जनतेच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या ३० वर्षांपासून सम ाजकार्यात सक्रिय असलेल्या इंगोले कुटुंबीय यांनी बीड जिल्ह्यात विकासकामांची ओळख निर्माण केली आहे. कोणताही राजकीय वारसा नसतानाही फक्त परिश्रम, जनसेवा आणि गोरगरिबांच्या मदतीच्या जोरावर त्यांनी



प्रभागातील जनतेच्या मनात ठसा उमटवला आहे.

समाजसेवेचा ध्यास, नागरिकांचा विश्वास : गोरगरिब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, रुग्णांना औषधोपचारासाठी सहाय्य,


▶▶ उर्वरित पान २ वर




## अंबाजोगाईत १६ वर्षीय विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील नेताजी नगर परिसरात शनिवारी रात्री सुमारास एका १६ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. आर्यन आबासाहेब चौरे (वय १६, रा. जीवाची वाडी ता. अंबाजोगाई) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. आर्यनने नुकताच ११ वी वर्गात प्रवेश घेतला होता. तो शिक्षणासाठी अंबाजोगाई शहरातील



▶▶ उर्वरित पान २

### बीडमध्ये शिवसेनेच्या उमेदवार निवडीसाठी १० नोव्हेंबर रोजी मुलाखती

**सर्व इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवाल सह उपस्थित राहावे: अनिलदादा जगताप**

**बीड । प्रतिनिधी**

आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या अनुषंगाने पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या इच्छुकांची मुलाखत येत्या सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.



या मुलाखतींचे आयोजन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे करण्यात आले आहे. सर्व इच्छुकांनी आपल्या कार्य अहवालासह सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख

▶ उर्वरित पान २

## प्रश्न आमचे आत्ता समाधान देखील आम्हीच करणार!

**● बीडकरांनी केला पक्का निर्धार, सुसंस्कृत आणि निष्कलंक उमेदवार हाच एकमेव पर्याय !**
**● पत्रकार राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा जोगदंड यांना नगराध्यक्ष करण्यासाठी बीडकर करु लागले संकल्प**

**बीड । प्रतिनिधी**

प्रश्न आमचे आणि समाधान प्रस्थापीत लोकच करु शकतात अशी बहुजन समाजाची आजवरची भावना झाली होती. परंतू वारंवार सत्ता देऊनही बहुजनांचे कल्याण सोडा तर त्यांचे गल्लतील साधे-साधे प्रश्नही आजवर सुटले नाहीत. त्यामुळे आज शहरातील वार्डा-वार्डातील सर्व सामान्य जनता त्रस्त असून अनेक समस्यांशी त्यांना नित्याची झुंज द्यावी लागत आहे, परंतू आत्ता बस्स झाले. प्रश्न आमचे



आत्ता समाधन देखील आम्हीच करणार असा बीडकरांनी पक्का निर्धार केला असून सुसंस्कृत आणि निष्कलंक उमेदवार हाच एकमेव पर्याय म्हणून बीडकरांना अनुभवायाला येणारे प्रश्न तळमळीने सोडविण्यासाठी सायं. दैनिक दृष्टीकोन न्यूजचे संपादक अजय उर्फ राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा अजय जोगदंड यांना नगराध्यक्ष करण्यासाठी बीडकर संकल्प करु लागल्याचे चित्र पहायाला मिळत असून तशी चर्चा देखील शहरातील वार्डा-वार्डात होऊ लागली आहे.बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षपद

▶ उर्वरित पान २ वर

**● बहुजन मुक्ती पार्टी कडून निवडणूक लढविण्याची समाजातून मागणी– राष्ट्रीय स्तरावर देशातील बहुजन समाजाचे प्रश्न मांडून एससी, एसटी, ओबीसी व अल्पसंख्याक समाजा च्या हक्क अधिकारासाठी अहोरात्र झाटणारी एकमेव पार्टी म्हणून बहुजन मुक्ती पार्टीला समाज मान्यता मिळाली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने बहुजन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील पार्टीच्या माध्यमातून बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष निवडणूक सुषमा अजय उर्फ राजू जोगदंड यांनी लढाववावी व समस्त बहुजन समाजाला आणि बीडकरांना राष्ट्रीय स्तरावर न्याय मिळवून देण्याची जोरदार मागणी तमाम बहुजन समाजासहबीडकरांमधून होतं आहे.**

# मुलांना हवे मानसिक स्वातंत्र्य !

महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील अंगणवाड्यामंध्ये पालक मेळावा आयोजित करण्यात येतो. याचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो. आरंभ या कार्यक्रमाच्या तीन मुख्य व्यासपीठांपैकी एक म्हणजे पालक मेळावा. घरभेटी आणि मातामंडळ बैठकांबरोबरच पालक मेळाव्याचा उद्देश म्हणजे संपूर्ण समुदायाने एकत्र शिकणे आणि मुलांच्या संगोपनाबद्दल आई बरोबर वडील आणि कुटुंबातील सदस्यांनी जागरूक होणे आवश्यक आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. याप्रमाणे युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे जी मुले आणि मातांची कल्याणासाठी काम करते. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, जगभरातील मुलांना अन्न, आरोग्य सेवा, शिक्षण आणि संरक्षण उपलब्ध करून देणे, आपत्ती, युद्ध किंवा दारिद्र्यग्रस्त भागातील मुलांना मदत करणे, लसीकरण, स्वच्छ पाणी आणि शिक्षणाच्या कार्यक्रमांद्वारे मुलांचे जीवन सुधारणे यासाठी १९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धग्रस्त देशांतील मुलांना मदत करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

लहान मुलांना खेळ, संवाद आणि सुरक्षित वातावरणापासून ते त्यांच्या आहारापर्यंत माहिती सांगणारे स्टॉल्स, खेळणी, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल माहिती देण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, आशा ताई करत आहेत. प्रत्येक बालकाच्या उत्तम वाढीसाठी पहिले हजार दिवस सुवर्णमयी असतात. त्यात पालक, घरातील सदस्याचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे पालकांशी मनमोकळा संवाद साधण्यासाठी महिला व बालविकास विभाग युनिसेफच्या समन्वयाने आईबरोबर वडिलांनीही बालकाला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी याचबरोबर घरातील सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी असल्याचे प्रबोधन या पालक मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येते. अनेकदा मी मुलांना काहीही करण्यापासून रोखते, त्यांना ओरडते. त्यामुळे मुले तात्पुरती गप्प बसतात. पण पालक मेळाव्याच्या माध्यमातून हे समजले की मुलांना कायम नकारात्मक प्रतिक्रिया देऊन त्यांच्या वाढीवर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या पद्धतीने गोष्टी करू दिल्या तर त्यांची बौद्धिक वाढ उत्तम होते. अशी प्रतिक्रिया अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकाने दिली.

अंगणवाड्यांचे समूह एकत्रित करून त्यांच्या पालकांना मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र करण्यात येते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांच्या विकासात सुधारणा, कुटुंब आणि समुदाय सशक्त करणे, बाल संगोपनाबद्दल समुदाय जागरूकता वाढवणे, अंगणवाडी आणि आशा ताईंची भूमिका अधिक बळकट करणे, समग्र बालकांच्या काळजीबाबत दृष्टीकोन तयार करणे, समुदायाचा सहभाग आणि आत्मविश्वास वाढविणे, सातत्याने टिकणाऱ्या बालकांच्या पद्धतींचा प्रसार करण्याचे काम करण्यात येते.

या मेळाव्यात दोन वर्षे वयोगटापर्यंत मुलांसाठी वयोगटानुसार खेळणी आणि शैक्षणिक साहित्य दाखवले जाते, दोऱ्यांचे जुने पुंजके, साबणाचे बॉक्स, कागदी डबे या वापरलेल्या वस्तूंपासून तयार केलेल्या खेळांच्या माध्यमातून मुलांच्या पाचही इंद्रियांचा विकास करणे हा उद्देश होय. दोऱ्यांचे वापरलेले रिळ, टाकून दिलेली झाकणे, पुठ्ठा, बांगड्या, साबणाचे रिकामे कागदी डब्बे यापासून बनवलेली तोरणं, माळा, रंगीत खेळणी मुलांना मेळाव्यात खिळवून ठेवतात. खेळणाऱ्या मुलांबरोबर त्यांची आई आणि इतर पालकांचाही समावेश होतो. काही खेळ हे पालकांसाठी असतात. या मेळाव्याच्या माध्यमातून बालकांशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मुलांना विविध मुखवटे व टोपी घालून त्यांना आरशासमोर उभे केले जाते. जेणेकरून त्यांना स्वत:चा चेहरा पाहता येतो. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद वाढवणे, मेंदूचा विकास, सामाजिक आणि भावनिक वाढ होण्यास मदत होते. याचबरोबर ब्रेन वायरिंग खेळाच्या माध्यमातून खेळ अनुभव आणि संवेदनाच्या आधारे मेंदूच्या न्यूरल कनेक्शनच्या निर्मितीचे महत्त्व समजावतो. मुलाचा मेंदू पहिल्या १००० दिवसात सर्वाधिक वाढते म्हणून या काळात स्पर्श, संवाद आणि खेळ यावर भर दिला जातो. पालक मेळाव्यात मुलांसाठी बाहूली घर तयार केले जाते. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर करून खेळ खेळवले जातात. यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते. पौष्टिक पोषण अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत आणि त्यानंतरचे अन्न कसे असावे हे दाखवले जाते. तसेच जंक फुडचे दुष्परिणाम आणि स्थानिक फळभाज्यांचा उपयोग सांगितला जातो. याचबरोबर आरोग्याची जनजागृती कार्यक्रमात लसीकरणाचे वेळापत्रक, स्वच्छता, आयर्न-फॉलिक सिडचे महत्व, निमिया प्रतिबंध इत्यादी माहिती वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर यांच्यामार्फत करण्यात येते. पालक हेच मुलांचे पहिले शिक्षक असतात, तीन वर्षांच्या वयातील विकास हा आयुष्यभरासाठीचा पाया घालतो. मुलांशी संवाद, प्रेम आणि संधी दिल्यास त्यांचा मेंदू, लक्ष आणि स्मरणशक्ती जलद वाढते. प्रोत्साहन हेच सर्वांत मोठे शिक्षण आहे.

**– श्रद्धा मेश्राम,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय**

◆ पान १ वरून पुढे...

## महाराष्ट्राच्या राजकारणात....

पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार आहेत. त्यांनी सुमारे २० वर्षे बीड जिल्ह्यातील आष्टी या मतदारसंघाचे नेतृत्त्व केलेले आहे. धोंडे यांच्या या निर्णयमुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार भाजपाचे नेते तथा आमदार सुरेश धस यांना आव्हान देण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे आपली ताकद लावणार असून ते आणि बाळासाहेब आजबे हे एकत्र काम करणार आहेत. धोंडे यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे आष्टी मतदारसंघात आमदार सुरेश धस यांना माजी आमदार धोंडे आणी माजी आमदार आजबे येणाऱ्या निवडणुकीत मोठे आव्हान देण्याची शक्यता आहे. धोंडे यांच्यामुळे आष्टी मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद चांगलीच वाढणार आहे. दरम्यान, धोंडे यांचा राष्ट्रवादी प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या भविष्यकालीन योजना सांगितल्या आहेत. महेश सहकारी साखर कारखाना मला चालू करायचा आहे. कर्करोगावर मोफत उपचार करणारे रुग्णालयही मला सुरू करायचे आहे, असे भीमराव धोंडे यांनी सांगितले आहे. तसेच आष्टी मतदारसंघातील हजारो युवकांना व नागरिकांच्या हाताला काम मिळावे यासाठी मी अजित पवार गटात प्रवेश करत आहे, असे म्हणत भविष्यात आष्टी मतदारसंघातील राजकारण चांगलेच पेटणार असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. त्यामुळे आगामी काळात नेमके काय होणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## न.प.निवडणुकीत...

समाजाला मोठा दिलासा मिळाला असून, मराठा समाजातील कुणबी प्रमाणपत्रधारकांना मात्र पक्षातर्फे उमेदवारी मिळणं कठीण झालं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पवार यांनी आमदार-खासदारांना स्पष्ट सूचना दिल्या की, जिथे मूळ ओबीसी उमेदवार उपलब्ध असेल, तिथे त्यालाच तिकीट द्या. केवळ जिथे मूळ ओबीसी मिळणारच नाही, तिथेच पर्याय म्हणून कुणबी प्रमाणपत्र असलेल्या इच्छुकाला संधी द्या. याशिवाय बैठकीत पुन्हा एकदा कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत युती नको असा निर्धार व्यक्त झाला. यापूर्वीच्या बैठकीत पक्षानं जास्तीत जास्त तरुण-नव्या चेहऱ्यांना संधी असा निर्णय घेतला होता. आता ओबीसी प्राधान्य आणि तरुण उमेदवार अशी दुहेरी रणनीती अवलंबली आहे. हैद्राबाद गॅझेटमुळे मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळालं असलं, तरी ओबीसी समाजाचा मराठा आरक्षण ओबीसीमधून नको असा विरोध कायम आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटानं ओबीसींच्या बाजूनं ठाम भूमिका घेऊन समाजाला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यातील नगर पंचायत-नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गट आता ओबीसींचा 'मुख्य आधार' आणि तरुणांचा 'नवा चेहरा' घेऊन मैदानात उतरणार आहे. पवारांच्या या दोन मोठ्या निर्णयांमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत समीकरणंही बदलणार असून, भाजप-महायुतीला थेट आव्हान मिळणार हे निश्चित झालं आहे.

## राज्यातील वक्फच्या ....

कसल्याही प्रकारचा गाफिलपणा, हयगय न करता आजच्या आज नोंदणी करून घ्यावी. कागदपत्रासंबंधी काही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ वक्फ बोर्डाच्या कार्यालयाशी संपर्क करावा, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल असेही ना. समीर काझी यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील वक्फ संपत्तीचे व्यवस्थापन पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यासाठी उम्मीद पोर्टलवर ही नोंदणी आवश्यक आहे. राज्यातील सर्व मस्जिद, दर्गा, कब्रस्तान आणि इतर वक्फ संस्थांनी आपल्या संस्थेची आवश्यक कागदपत्रे ज्यामध्ये नोंदणी प्रमाणपत्र, मालकी हक्काचे दस्तऐवज, विश्वस्त मंडळाची माहिती इत्यादी उम्मीद पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. या उपक्रमामुळे राज्यातील वक्फ मालमत्तेचा योग्य नोंदवही तयार होईल तसेच फसवणूक, अनधिकृत वापर आणि गैरव्यवहारांना आळा बसणार असल्याचे त्यांनी ना. समीर काझी यांनी सांगितले. उम्मीद पोर्टलवर नोंदणीसाठी दि.५ डिसेंबर २०२५ ही अंतिम तारीख आहे. त्यानंतर नोंदणी करता येणार नाही. ज्यांची नोंदणी होणार नाही अशा संस्था अनाधिकृत ठरू शकतात. त्यामुळे नोंदणी आवश्यकच आहे. नोंदणीसंबंधी अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी वक्फ बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी किंवा जिल्हा वक्फ बोर्डाच्या कार्यालयाशी संपर्क करावा असे आवाहन अध्यक्ष ना. समीर काझी यांनी केले आहे.

## स्वहितापेक्षा शेतकर्यांचे...

अमृताश्रमजी महाराज, श्रीक्षेत्र ढेकळे महाराज संस्थान बेलखंडी पाटोदा येथील ह.भ.प. भक्तीदास महाराज, साधकाश्रम तिप्पटवाडी येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज आदी संत-महंत उपस्थित होते. यासोबतच माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह अनेक मान्यवर आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न.प.निवडणूक: ....

अशोक हिंगे, फारूक पटेल यांचा समावेश होता. या मंडळासमोर रात्री उशिरापर्यंत नगरसेवक पदासाठी दीडशेहून अधिक तर नगराध्यक्ष पदासाठी १६ इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या. याप्रसंगी महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ड.प्रज्ञा खोसरे, तालुकाध्यक्ष अ‍ॅड.राजेंद्र राऊत, कार्यालय चिटणीस महादेव धांडे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगराध्यक्ष पदासाठी १६ इच्छुकांनी दिल्या मुलाखती- नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव आहे. या पदासाठी ३५ इच्छुक उमेदवारांनी अर्ज खरेदी केले होते. त्यापैकी १६ इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या आहेत. यामध्ये प्रणिती राजेंद्र पवार, सारिका विकास जोगदंड, पूजा भीमराव वाघचौरे, मीना भिमराव वाघचौरे, पूजा गणेश वाघमारे, क्रांती बाबुराव वडमारे, वंदना शरद साळवे, मीना अशोक वाघमारे, क्रांती प्रेम चांदणे, सविता मनोज मस्के, संगीता सुरेश वाघमारे, लता अविनाश शिरसट, छाया अशोक वीर, सुनिता उत्तम पवार, सुप्रिया माणिक वाघमारे, राधा चंद्रकांत थोरात यांचा समावेश आहे.

माहोल बदलने वाला है! मुस्लिम उमेदवारांकडून जोरदार तयारी- बीड शहरात सुमारे ४० टक्के म्हणजेच तब्बल ६५ हजार मुस्लिम मतदार आहेत. आजवर या मतदारांना गृहीत धरून मते घेतली गेली; मात्र यापुढे तसे होणार नाही. अजितदादा पवार यांची भूमिका आणि विकासाचा मुद्दा लक्षात घेता मुस्लिम समाज राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोबत राहणार असल्याचे अनेक मुस्लिम बांधवांनी स्पष्ट केले.

## बसमध्ये चढताना ...

अज्ञात चोरट्याने त्यांची मुलगी दिपाली यांच्या गळ्यातील २४ हजार रुपये किंमतीचे आठ ग्रॅमचे मणीमंगळसुत्र लांबविले. त्यांच्या गळ्याला हिसका बसल्याने त्यांनी गळ्याला हात लावून बघितल्यावर हा प्रकार उघडकीस आला. मीरा चाटे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार विष्णू नागरगोजे हे करीत आहेत.

## जनतेचा नेता, ....

तरुणांना उद्योजकतेकडे वळण्यासाठी प्रेरणा देणे, तसेच परिसरातील विविध सामाजिक प्रश्नांवर उपाययोजना करणे – हे त्यांच्या कार्याचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे.

पर्यावरण संवर्धन, रक्तदान, वृक्षारोपण, जलसंधारण आणि अन्नदान अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये विनोद आप्पा इंगोले पाटील नेहमीच पुढाकार घेतात. स्वत:साठी नव्हे, समाजासाठी काहीतरी करायचं ही त्यांची विचारसरणी नागरिकांना भावते.

जनतेचा नेता,हक्काचा माणूस : सौं. वनिता विनोद आप्पा इंगोले यांच्या साधेपणात आणि आपुलकीच्या स्वभावात एक आपलेपणा जाणवतो. संकटाच्या वेळी माझा माणूस आहे अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच त्यांच्या नगरसेवक पदाच्या चर्चेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.

मुत्सदी नेतृत्वाची झलक : बीड नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक १५ मधून सौं. वनिता विनोद इंगोले यांना उमेदवारी मिळणार असल्याचे निश्चित झाले असून कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्यांचे सम ाजाभिमुख कार्य, नेतृत्वगुण आणि सर्वसमावेशक दृष्टी यामुळे ते जनतेच्या मनातील उमेदवार ठरत आहेत.

कार्य, नेतृत्वगुण आणि सर्वसमावेशक दृष्टी यामुळे ते जनतेच्या मनातील उमेदवार ठरत आहेत.

## अंबाजोगाईत १६....

नेताजी नगर भागात भाड्याच्या खोलीत वास्तव्यास होता. शनिवारी रात्री त्याने दोरीने गळफास घेतल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया उशिरापयरत सुरू होती.

## बीडमध्ये शिवसेनेच्या...

अनिलदादा जगताप यांनी केले आहे. मुलाखतीदरम्यान बीड शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक उपस्थित राहणार असून, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नमूद केले. शिवसेनेच्या उमेदवार निवड प्रक्रियेत इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

## प्रश्न आमचे आत्ता....

हे पहिल्यांदाच अनुसूचित जाती महिला प्रर्वगासाठी राखीव झाले आहे. त्यामुळे आपल्या हक्काचा माणूस सामान्यांच्या मुलभूत प्रश्नांची जाण व त्याची सोडवणूक करण्याची धमक असलेलं सक्षम नेतृत्व म्हणून आजवर आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्यांचा आवाज बनून सायं. दैनिक दृष्टीकोन न्यूजचे संपादक अजय उर्फ राजू जोगदंड यांनी आपल्या प्रखड लेखणीतून शहरातील विविध समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. पैश्यासाठी सत्ता आणि सत्तेसाठी पैसा करणार्यांना तगड आव्हान देण्यासाठी बीड शहरातील नागरिकांनी पत्रकार अजय उर्फ राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा अजय जोगदंड यांना बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी उम ेदवार म्हणून निवडणुक लढविण्यासाठी बहुजन समाज एकमुखाने आग्रह करु लागला आहे.

त्यामुळे बहुजनांशी नाळ जोडून असलेले पत्रकार राजू जोगदंड व त्यांच्या सौभाग्यवती सुषमा अजय उर्फ राजू जोगदंड यांनीही समाजाचा आग्रह लक्षात घेता व पती अजय उर्फ राजू जोगदंड यांचे सामाजिक कार्य आणि सम ाजाप्रती असलेली तळमळ पाहुन त्यांना आपल्या वैवाहिक जिवनापासून गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने आजतगायत सुख-दु:खाच्या संकाटात साथ देऊन बहुजनांच्या भल्यासाठी साथ सहयोग दिला. बहुजन समाजाचे दु:ख दुर करण्यासाठी संकटांशी झुंज देण्यासाठी व समाजाच्या आग्रहामुळे बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी सुषमा अजय उर्फ राजू जोगदंड यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असून त्यांच्या विजयासाठी बीडकरांनी देखील संकल्प करत सुसंस्कृत आणि निष्कलंक उमेदवार हाच पत्रकार राजू जोगदंड यांच्या पत्नी सुषमा जोगदंड एकमेव पर्याय असून प्रश्न आमचे आत्ता समाधान देखील आम्हीच करणार म्हणून बीडकरांनी चंग बांधल्याचे बोलले जाऊ लागल्याने प्रस्थापीतांची मात्र घाबरगुंडी उडाली असल्याचे चर्चा वार्डा-वार्डात होत असून बहुजनांनी समता-बंधुभाव आणि न्याय प्रस्थापीत करण्यासाठी सुषमा अजय उर्फ राजू जोगदंड यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने प्रस्थापीत पक्षांसह त्यांच्या तकलादू उमेदवारांची पाचावर धारण बसली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## गेवराई भाजपाचा....

दिवसात भाजपाचे खंदे समर्थक राष्ट्रवादीमध्ये आल्यामुळे शिवाजीनगर म धील भाजपाचा बुरुज ढासळल्याची चर्चा गेवराई शहरात सुरु आहे. यावेळी बोलतांना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, वीस वर्षे नगर परिषद आणि दहा वर्षे आमदार म्हणुन सत्तेत असतांनाही शहराच्या विकासाचे प्रश्न रखडत ठेवले. आमदारकीच्या काळात लोकांना तोंड न दाखवणारे आज तोंड लपवत फिरत आहेत. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळे लोकांना धमकावणे आणि खोटे-नाटे आरोप करुन टिका करण्याचे उद्योग ते करत आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने दोघांचे डिपॉझिट जप्त करुन त्यांना जागा दाखवुन देण्याचे काम केले आहे. आता सत्तेच्या लालसेने अभद्र युती करुन निवडणुकीला सामोरे जाण्याचा केविलवाणा प्रयत्न या मंडळीकडुन सुरु आहे. सत्तेच्या लालसेने दोन विरोधक एकत्र आले तरी जनता मात्र त्यांना स्विकारणार नाही. आजवर सत्ता असतांना विकास कामे केली असती तर ती कामे लोकांसमोर किमान मांडता आली असती, सांगण्यासारखे काहीच केले नसल्यामुळे हे लोक नैराश्येने दादागिरीची भाषा बोलत आहेत. योग्य वेळी त्यांना जनता धडा शिकवेल असा टोल आ. विजयसिंह पंडित यांनी लगावला. विधानसभेच्या निवडणुकीनंतर केवळ दहा महिण्यात आमदार विजयसिंह पंडित यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहराच्या विकासासाठी भरीव निधी मंजुर केला आहे. शहरातील अनेक वर्षापासुनचे रखडलेले प्रश्न मार्गी लावले आहेत. अल्पसंख्यांक समाजाला शादीखाना देवुन गोर-गरीबांच्या लग्नाची अल्पदरात सोय केली आहे. येणार्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास करण्याची संधी द्यावी असे आवाहन माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी केले. शेवटच्या श्वासापर्यंत शिवछत्र परिवाराची साथ सोडणार नाही, कोणत्याही अटी शिवाय बिनशर्थ राष्ट्रवादीत प्रवेश करत आहे. शहराचा विकास करण्याची धमक केवळ शिवछत्र परिवारात आहे. त्यामुळे भाजपा सोडुन राष्ट्रवादीत प्रवेश करत असल्याचे समाधान मस्के यांनी आपल्या भाषणात सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष महाराज नागरे, विधानसभा क्षेत्र अध्यक्ष गजानन काळे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर आदींनी आपल्या भाषणात विरोधकांच्या भुमिकेचा सडेतोड सम ाचार घेवुन पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्याच उमेदवारांना निवडणुन देण्याचे आवाहन केले. यावेळी समाधान मस्के यांच्यासह सोनु सुतार, संतोष खंडागळे, सचिन दावडकर, स्वप्निल वाडकर, महेश पंडित, शंतनु परदेशी, विशाल जाधव, ऋषिकेश रावकर, रोहण काळे, अभिषेक तौर, अनिल सावंत, संतोष जराडे, किशोर ठोसर, तुषार जाधव, आकाश जाधव, किरण धापसे, ऋषि नागरगोजे, ओम तौर, पप्पू काळे, आदर्श घुले, आकाश चौरे, अनिल गव्हाणे, निखील धाईजे, अनिकेत तौर, गणेश राठोड, बाळु केशर यासह असंख्य कार्यकर्त्यांना भाजपाला सोडचिठ्ठी देवुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. आ. विजयसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाला रविंद्र बोराडे, शांतीलाल पिसाळ, युवराज जाधव, विजय सुतार, धमपाल सौंदरमल, दादासाहेब चौधरी, शिवाजी शिंदे, कृष्णा मुळे, विठ्ठल पवार यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि गेवराई शहरातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लेखक परमेश्वर...

महाराजांचे जीवन तत्त्वज्ञान, त्यांच्या कार्याची सामाजिक पार्श्वभूमी, भक्तीतील समतेचा संदेश आणि आजच्या पिढीसाठी असलेले त्यांचे म ार्गदर्शन यांचे सुंदर चित्रण केले आहे. त्यांनी सांगितले की, संत सावता महाराज हे केवळ भक्त कवी नव्हते, तर समाजजागृतीचा दीप होते. त्यांच्या शिकवणीने आजच्या युवकांना आणि समाजाला दिशा देणारे कार्य व्हावे, हीच या पुस्तक लेखनामागची प्रेरणा आहे.या प्रकाशनानिमित्ताने सर्व सम ाजबांधव, संतभक्त, साहित्यप्रेमी व वाचकवर्गाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लेखक परमेश्वर बनकर यांनी केले आहे. संत परंपरेचा गौरवशाली वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा सोहळा एक प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

## बीड शहरातील मोकाट ...

शहरातील विविध गल्लीबोळामध्ये आढळून येत आहेत आणि बीड शहरातील सर्वत्र प्रसिद्ध असलेले मार्केट भाजी मंडई या ठिकाणी देखील मोकाट कुत्रे भरपूर लोकांना त्या ठिकाणी आढळतात व त्या ठिकाणी संस्कार महाविद्यालय शाळा असल्यामुळे त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना देखील या मोकाट कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे डायरेक्ट म ाणसाच्या अंगावर चावा घेण्यासाठी कुत्रे धावून जातात असे अनेक ठिकाणी बीड शहरातील गल्लयामध्ये बोळीमध्ये मोकाट जनावर मोकाट कुत्रे दिसून येत आहेत म्हणून सी ओ साहेब आपण लवकरात लवकर यांचा बंदोबस्त करा त्यांच्यासाठी कोंडवाडा जो बंद पडलेला आहे तो तात्काळ चालू करा आणि त्या कोंडवाड्यामध्ये नेऊन हे मोकाट कुत्रे आणि मोकाट जनावरे घाला आणि त्यांची व्यवस्था त्या ठिकाणी नगर प्रशासनाच्या वतीने करा अन्यथा बीड नगरपालिकेमध्ये बीड शहरातील सर्व मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे आणून आम्ही सोडू असा खणखणीत इशारा देखील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून बीड नगर परिषदेला इशारा दिला आहे आता या वर बीड नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी ओ साहेब कशाप्रकारे दखल घेतात आणि कशाप्रकारे बीड शहरातील मोकाट कुत्र्यांचा व जनावरांचा सुळसुळाट थांबवतात हे पाहणे देखील येणाऱ्या भविष्य काळामध्ये गरजेचे असल्याचे बीड शहरातील सर्व नागरिकांमधून बोलले जात आहे .

## गाळ्यात आढळली....

ती येथे कोणी व कशासाठी ठेवण्यात आली होती,याचे गूढ उकलण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एक कोटीची गाडी ही कुटेची असल्याची चर्चा दबक्या आवाजात रंगली असून, पोलीस गाडीच्या चेसी नंबर, इंजिन नंबर वरून गाडी मालकाचा शोध घेत आहेत.

## ना.पंकजाताई मुंडे ...

क्षेत्रातील संघटनात्मक तयारीचा आढावा घ्यावा, यासाठी पक्षातर्फे विधानसभा निहाय निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निहाय निरीक्षकांची यादी खालीलप्रमाणे – बीड, परळी, माजलगाव विधानसभा क्षेत्रासाठी : श्री. शंकर देशमुख, श्री. अक्षय मुंदडा, श्री. गणेश कराड, श्री. अशोक लोढा, आष्टी, केज, गेवराई विधानसभा क्षेत्रासाठी : श्री. शंकर देशमुख, श्री. सर्जेराव तांदळे, श्री. नवनाथ शिराळे, श्री. संजय आंधळे, श्री. सतीश मुंडे. या नियुक्त्यांद्वारे प्रत्येक विधानसभा क्षेत्रात पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांशी संवाद साधणे व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ठोस रणनीती आखणे हा उद्देश आहे. भाजपच्या या तयारीमुळे बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिक चुरशीच्या होण्याची शक्यता आहे. पक्षाच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांना संघटित ठेवून विकासाभिमुख अजेंडा लोकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला असून, आगामी बैठकींना मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सर्व्हेक्षण पथक...

विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांनी बीड, गेवराई, परळी, माजलगाव, अंबेजोगाई, धारूर, पाटोदा आणि आष्टी येथील आगार प्रमुखांना स्वच्छतेसंदर्भात स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तसेच सर्व्हेक्षण समितीला सादर करण्यासाठी मास्टर कंट्रोल चार्ट, नोंदवही, बसस्थानक भेट नोंदवही आणि इतर संबंधित कागदपत्रांची तयारी सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तथापि, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, ही स्वच्छता केवळ सर्व्हेक्षण समितीच्या भेटीपूर्वीचा दिखावा आहे का ? की आता पुढेही नियमितपणे बसस्थानक स्वच्छ ठेवले जाणार आहे ?

## रेकॉर्डवरील तीन...

सध्या नगर परीषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक . नवनीत काँवत यांनी गुन्हेगारांना हददपार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस ठाणे पेठ बीड यांनी वरील तिन इसमांविरुदध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) प्रमाणे प्रस्ताव तयार करुन उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय बीड यांना पाठवला होता. त्या प्रस्तावाचे अवलोकन करुन उपविभागीय दंडाधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी वरील तीन इसमापैकी निखील किरण धारु रा. वतारवेस पेठ बीड यांना ०६ महीने साठी व शेख अखतर शेख रशीद रा. अचानक नगर पेठ बीड यांना ०१ वर्षासाठी बालाजी सुनिल गुणवंत रा. भोई गल्ली पेठ बीड बीड जिल्हयातुन ०६ महीन्यासाठी हददपार केले केले बाबत आदेश काढले आहेत. त्यांच्या आदेशाची आरोपी यांना बजावणी करुन त्यांना मा. उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे बीड जिल्हयातुन हददपार केले आहे. सदर आरोपी हे बीड जिल्हयात कोठेही आढळुन आल्यास स्थानिक पोलीसांना कळवावे असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे. यापुढेही गुन्हे करणा-या लोकांवर अशा प्रकारच्या हददपारीच्या कारवाया करण्यात येणार आहेत. वरील कार्यवाही . पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहा. पोलीस निरीक्षक प्रितमकुमार पुजारी, पोलीस हवालदार सुभाष मोठे, पोलीस हवालदार नितीन राठोड, पोलीस हवालदार अजित शिकेतोड, पोलीस हवालदार तुकाराम चांदणे, पोलीस अंमलदार औदुंबर गिरी यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### भूकरमापक पदांसाठी 13 आणि 14 नोव्हेंबर रोजी ऑनलाईन परीक्षा

**मुंबई । प्रतिनिधी**

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता १३ आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक आणि उमेदवारांच्या प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या https://mahabhumi. gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे. भूमि अभिलेख विभागातील उपरोक्त रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता १ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार विहीत कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी १३ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात पुणे आणि अमरावती विभागात परीक्षा होणार असून या विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजता उपस्थित राहावयाचे आहे. तर दुसऱ्या सत्रात नाशिक आणि नागपूर विभागांमध्ये केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी १२ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. दिनांक १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात मुंबई (कोकण) विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी सकाळी ८ वाजता तर दुसऱ्या सत्रात छत्रपती संभाजीनगर विभागात केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी बारा वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. या परीक्षा पद्धतीबाबतची सविस्तर माहितीपुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे भूमि अभिलेख कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### शिक्षक पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२५ चे प्रवेशपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून घ्यावी, असे आवाहन परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेच्या आयोजनाची कार्यवाही सुरू असून, परीक्षेस प्रविष्ट परीक्षार्थ्यांचे प्रवेशपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून घ्यावी. प्रवेशपत्र विहीत मुदतीत प्राप्त करून न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित परीक्षार्थ्यांची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### डंपर घरावर कोसळल्याने पाच वर्षीय बालकाचा मृत्यू, तिघे गंभीर जखमी




**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील कुरुंगवडी येथे रविवारी दुपारी घडलेल्या एका दुर्दैवी अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. क्रश सँड उतरवताना डंपर उलटून शेजारच्या घरावर कोसळल्याने एका पाच वर्षीय बालकाचा जागीच मृत्यू झाला आहे तर त्याच कुटुंबातील तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोर तालुक्यातील कुरुंगवडी गावात एमएच-१२ केपी-२११८ क्रमांकाचा डंपर बांधकाम साईटवर क्रश सँड खाली करत होता. त्यावेळी चालक अमरजीत राजभर हा निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याने डंपर अचानक असंतुलित होऊन बाजूच्या घरावरील पत्र्याच्या शेडवर कोसळला. या अपघातात घरात असलेल्या आलोक अशोक कचरे (वय ५) या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचबरोबर घरातील आरती अशोक कचरे (वय ३५), प्रियांका जगन्नाथ कचरे (वय १७) आणि श्लोक अशोक कचरे (वय ६) हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात घराचंही मोठं नुकसान झालं असून घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात वंदे मातरम् गीताचे गायन संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी वंदेमातरम् या गीताच्या निर्मितीला १५० वर्ष पूर्ण झाले असून त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या प्रांगणात सामुहिकरित्या वंदेमातरम् या गीताचे गायन संपन्न झाले. या गीताची रचना ऋषि बंकीमचंद्र चट्टोपध्याय यांनी केली. भारतमातेच्या संपन्नतेचे वर्णन करणारे विविधतेने नटलेल्या भारतभूला वंदन करणारे हे गीत सर्व भारतीयांचा अभिमान वाढवणारे असे आहे. या गीत गायन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,पर्यवेक्षक जालिदर कोळेकर,एनसीसी प्रमुख बालासाहेब पोटे तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी,बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल'

## नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले.




यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले.

## पुणे हादरलं, पत्नीची दृश्यम स्टाईल हत्या, मृतदेह जाळून राख ओढ्यात फेकली

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे, या घटनेनं खळबळ उडाली आहे. पत्नीच्या कथित प्रेमसंबंधाच्या संशयावरून पतीने पत्नीचा गळा आवळून खून केला आणि त्यानंतर मृतदेह जाळून त्याची राख ओढ्यात फेकून दिली आहे, पुण्यातील या दृश्यम स्टाईल हत्येच्या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ आता समोर आला आहे. हे दोघे पती-पत्नी घटनेपूर्वी जिथे भेळ खाण्यासाठी गेले होते, त्या ठिकाणचं सीसीटीव्ही फुटेज आता समोर आलं आहे. या व्हिडिओमध्ये आरोपी पती त्याच्या पत्नीला घेऊन जात असल्याचे समोर आले आहे. आरोपीने आधी आपल्या पत्नीची हत्या केली, त्यानंतर पुरावे नष्ट केले आणि स्वत; च पोलीस ठाण्यात जाऊन पत्नी हरवल्याची तक्रार दिली होती. मात्र पोलिसांना या प्रकरणात सुरुवातीपासून त्याच्यावरच संशय होता, त्याआधारे शोध घेऊन, पुरावे गोळा करून वारजे पोलिसांनी हे थरकाप उडवणारं हत्याकांड समोर आणलं आहे. समीर पंजाबराव जाधव असे या आरोपीचे नाव आहे, तर अंजली समीर जाधव (वय ३८) असे खून झालेल्या पत्नीचे नाव आहे. पत्नीचे एका व्यक्तीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपीला होता, तो सतत तिचा मोबाईल चेक करायचा, त्यातून पत्नी-पत्नीमध्ये भांडणं व्हायचे. अखेर त्यानंतर आरोपीने आपल्या पत्नीच्या हत्येचा कट रचला. त्यासाठी त्याने शिंदेवाडी येथे १८ हजार रुपये भाड्याने एक गोदाम घेतले, या गोदाममध्ये त्याने आधीच लोखंडी भट्टी तयार करून ठेवली, तिथे लाकडं देखील आणून ठेवले. त्यानंतर आरोपीने २६ ऑक्टोबर रोजी आपली पत्नी अंजलीला कारमध्ये फिरायला नेले. नवले ब्रिजमार्गे खेडशिवापूर, मरीआई घाट परिसरात फिरवल्यानंतर परतीच्या प्रवासात शिंदेवाडी येथे थांबून भेळ खाण्याचा बहाणा केला, त्यानंतर गोडाऊनमध्ये चटईवर बसून दोघे भेळ खात असताना त्याने अचानक तिचा गळा दाबून खून केला. त्यानंतर पत्नीचा मृतदेह लोखंडी बॉक्समध्ये टाकून पेट्रोल ओतून जाळला. आणि राख ओढ्यात टाकून दिली, तसेच तो लोखंडी बॉक्स देखील भंगारामध्ये विकला आहे.

### रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, शिव महापुराणकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन


**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार दि.१२ नोव्हेंबर पासुन ते बुधवार १९ नोव्हेबर २०२५ पर्यंत आयोजित केला आहे. यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शिवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. शिवमहापुराण कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.१२ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल. दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील.

## नायलॉन मांजाने दुचाकीस्वार शेतकऱ्याचा मृत्यू; रात्रीच्या अंधारात धारदार दोऱ्याने गळा चिरला

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या देवळी तालुक्यातील भिडी येथील एका दुचाकी चालकाचा पतंगीच्या नायलॉन मांजामुळे गळ्याला फास लागून मृत्यू झाला असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सायंकाळी सहाच्या सुमारास भिडी येथील रस्त्यावर घडलेल्या या दुर्घटनेत एका निष्पाप शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, दुसरीकडे सोलापूर विमानतळ परिसरातही नॉयलॉन मांजामुळे विमान वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचं समोर आले




असून पोलिसांनी कारवाई करत विक्रेता आणि पतंग उडवणाऱ्या मुलांच्या पालकांवर गुन्हा दाखल केला आहे.भिडी येथील सुभाष शेलोटे हे पन्नास वर्षीय शेतकरी आपल्या शेतातील फवारणीचे आपले काम आटोपून दुचाकीने घराकडे जात असताना अचानक रस्त्यावर गळ्याला पतंगीचा मांजा आवळला गेला. पतंगीचा हा मांजा अतिशय घातक आणि धारदार असल्याने त्यांचा गळा चिरला व गळ्याला घट्ट फासही बसला गेला. त्यामुळे, या दुर्दैवी अपघातात सुभाष शेलोटे यांचा मृत्यू झाला. नायलॉन मांजाच्या धाग्याने बळी घेतला असून सुभाष हे दुचाकीवरुनच गाडीवर पडले, त्यानंतरच जागेवरच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. भिडीतील या दुर्दैवी घटनेनं पुन्हा एकदा नायलॉन मांजाचा प्रकोप समोर आला असून मांजाला बंदी असताना हा नॉयलॉन मांजा येतो कुठून? असाच प्रश्न उपस्थित होत आहे.

## ह.भ.प. ज्योतिषाचार्य बबन देव महाराज जोशी यांच्या कीर्तनाने सप्तदिवसीय कथा संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर यशवंत नगर येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेली श्रीमद् भागवत कथा भक्तीमय वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सात दिवसांच्या कार्यक्रमाचे प्रमुख कथावाचक ह.भ.प. ज्योतिषाचार्य बबन देव महाराज जोशी (बीड) यांनी आपल्या मधुर, प्रभावी आणि ज्ञानदायी वाणीने कथा सादर करून उपस्थित भाविकांना अध्यात्म, धर्म आणि भक्तीचा सुंदर संगम अनुभवायला लावला. या कालावधीत भगवान श्रीकृष्णाचे बाललीला, भक्त प्रल्हादाची



कथा, गोवर्धन पूजा, गीतेचा उपदेश, रुक्मिणी विवाह, आणि श्रीकृष्ण-उद्धव संवाद या भावनिक प्रसंगांनी रसिकांना आध्यात्मिक आनंद दिला. कथा केवळ श्रवणीय नव्हे, तर दृश्यकलांनी सजलेली होती. पात्रांची आकर्षक वेशभूषा, संगीतमय सादरीकरण, आणि महाराजांच्या हृदयस्पर्शी वाणीमुळे दररोज मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित राहत होते. या सात दिवसीय कार्यक्रमात परिसरातील महिला मंडळ, तरुणाई, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनाही उत्स्फूर्त सहभाग होता. प्रत्येक दिवशी कथा श्रवणासाठी येणाऱ्या भक्तांच्या गर्दीने यशवंत नगर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या भक्तिपर्वाला विशेष शोभा आणली ती मान्यवरांच्या उपस्थितीने.

## 'कुंभमेळा' सुरक्षित होण्यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करावे : मुख्य सचिव राजेशकुमार

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणारा आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे सूक्ष्म नियोजन करावे. त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांना येण्यासाठी आणि जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असाव्यात, अशा सूचना मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या आहेत.

मुख्य सचिव राजेश कुमार दोन दिवस नाशिक जिल्हा दौऱ्यावर असून त्यांनी आज



सकाळी त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा विकास कामे तसेच त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली. यावेळी विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, मंदिराचे विश्वस्त यांचेसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## दीड वर्षांच्या चिमुकल्याला विष पाजून आईने आयुष्य संपवलं

**सोलापूर । प्रतिनिधी**



बार्शी तालुक्यात एका आईने आपल्या लहान मुलासह आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बार्शी शहरातील वाणी प्लॉट परिसरात ही घटना घडली. मृत महिलेचे नाव अंकिता वैभव उकिरडे असे आहे. अंकिता ही विवाहित असून तिला १४ महिन्यांचा मुलगा होता. अंकिताने आपल्या चिमुरड्याला विष पाजून त्यानंतर साडीने गळफास लावून आत्महत्या केल्याचा प्रकार शुक्रवारी सकाळी उघडकीस आला होता. मात्र, यामध्ये अंकिता यांचा मुलगा अन्विक उकिरडे हा वाचला आहे. परंतु, त्याची प्रकृती गंभीर आहे. अंकिता उकिरडे यांनी टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. मात्र, या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे वाणी प्लॉटसह बार्शी शहरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर बार्शी पोलिसांनी मृतदेहाचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# डोक्यावर छप्पर नव्हतं, पण जिद्द होती! बहरीनमध्ये सनी फुलमाळीचा सुवर्ण विजय, चंद्रकांतदादांनी घेतलं पालकत्व

**पुणे । प्रतिनिधी**

घरची अत्यंत बिकट परिस्थिती, डोक्यावर छप्पर नाही आणि राहायला केवळ पालावरचं घर. पण या सर्व अडचणींवर मात करत लोहगावच्या सनी फुलमाळीने आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर भारतासाठी सुवर्ण पदक जिंकत इतिहास रचला आहे. बहरीन येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्णपदक पटकावणाऱ्या या तरुण खेळाडूचं आता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी




पालकत्व स्वीकारलं आहे.

मंत्र्यांचा भावनिक निर्णय- चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वतः लोहगावमधील सनी फुलमाळी आणि त्याच्या कुटुंबाची पालावर भेट घेत त्याचं कौतुक केलं. यावेळी त्यांनी जाहीर केलं की, सनीसाठी लोकसहभागातून घर बांधून देणार. कुस्तीच्या सरावासाठी तालीम उभारणार. तसेच शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत करणार. त्याचबरोबर त्यांनी स्वतःच्या आणि पत्नीच्या उत्पन्नातून दरमहा ५० हजार रुपयांची मदत करण्याची घोषणा केली.

कुस्तीच्या विश्वातील नवा तारा- सनी फुलमाळीचा हा विजय फक्त क्रीडा क्षेत्रातला नाही तर समाजातील वंचित घटकांसाठी प्रेरणा देणारा आहे. सनीच्या प्रशिक्षक वस्ताद सदाशिव राखपसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सनीने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली. कार्यक्रमाला भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीपआप्पा भोंडवे, माजी नगरसेवक बॉबी टिंगरे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश संघटनेचे स्वामी धनगर, शरद माकर, किशोर शिंदे, अरविंद देवकर यांनी सनीच्या परिस्थितीकडे सरकारचं लक्ष वेधलं. त्याबद्दल चंद्रकांत पाटील यांनी संघटनेचे आभार मानले आणि आगामी काळात अशा खेळाडूंना सर्व प्रकारची मदत करण्याचं आश्वासन दिलं.

शासकीय नोकरीचा मार्ग खुलेल- चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, राज्यातील १७ वर्षांवरील आंतरराष्ट्रीय पदकविजेत्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात घेण्यात आला होता. मात्र, आता सनीच्या निमित्ताने १७ वर्षाखालील खेळाडूंनाही ही संधी मिळावी यासाठी मी स्वतः मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### रंभाबाई सानप यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त ह भ प ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

कै रमाबाई आसाराम सानप राहणार रायमोह तालुका शिरूर जिल्हा बीड यांचे प्रथम पुण्यस्मरण असून सानप कुटुंबातील रमाबाई आसाराम सानप यांना देवाज्ञा होऊन संपूर्ण एक वर्ष पूर्ण झाले असून सानप परिवाराच्यावतीने त्यांच्या समर्थ कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला असून संपूर्ण रायमोहा परिसरातील व गावातील नागरिकांनी वजनतेने या कीर्तनाचा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा प्रथम पुण्यस्मरण मंगळवार दिनांक ११/११/२०२५रोजी असून त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त विनोदाचार्य ह भ प ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान समस्त सानप परिवाराने केले आहे मंगळवार सकाळी १०/ते १२ वाजता किर्तन होणार असून भोजन दुपारी १२/ ते आपल्या आगमनापर्यंत राहील तरी सर्वांनी लाभ घ्यावा ही विनंती.

### क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ८/ ९ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड बॅडमिंटन हॉल या ठिकाणी संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये खाली खेळाडूंने विभागीय स्पर्धेकरिता आपले स्थान निश्चित केले. १४ वर्षाखालील मुले – कृष्णा श्याम भुतडा ४५ ते ५० किलो प्रथम , गौरव लक्ष्मण साठे ३१ते ३५ प्रथम क्रमांक , व्यंकटेश शिंदे. –६४ किलो, बागवान मानस ५५ किलोग्रॅम, १७ वर्षाखालील मुले ज्योतीराम गोकुळ जगदाळे – ५४ किलो खाली , देवांग हनुमंत शिंदे मानस ५५ ते ६० , उमर बागवान –६६ किलो खाली, १९ वर्षाखालील मुले , संघर्ष सुहास जायभाय –६० , १४ वर्षाखालील मुली , आरुषी लक्ष्मण जायभाय–६०, १७ वर्षाखालील मुली, वैष्णवी शिंदे –५६ , अपेक्षा अमोल मुसळे +६८ , १९ वर्षाखालील मुली , किशोरी लक्ष्मण साठे –६६, वरील सर्व खेळाडूंनी आपल्या वयोगट व वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून जालना या ठिकाणी होणाऱ्या विभागीय स्पर्धेकरिता आपले स्थान निश्चित केले सर्व दुतीय क्रमांक प्रांजल सपाटे, स्पर्शिका सपाटे, प्रांजल शिंदे, सुरा वडमारे, जयश्री मोहरे, वैष्णवी फटाले , रिद्धी फटाले, हरीश सोळंके , रितेश पाबळे, गोविंद कुलकर्णी, दूर्वाल नवले , शौर्य मोहरे, यशराज सरपदे, वरील सर्व खेळाडू जिल्हा क्रीडा संकुल बीड ठिकाणी मुख्य प्रशिक्षक उत्तरेश्वर सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहेत तसेच राष्ट्रीय खेळाडू पवन जोगदंड मार्गदर्शन लाभले जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , जितू आराक सर अविना पाटील सर, अनिल काळे सर कायदास हसुरकर , रेवन शेलार सर वरील सर्व मान्यवराने खेळाडूंना विभागीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

### धारूर प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेवक पदाच्या शर्यतीत विश्वास शिनगारे ? चर्चेला वेग !

**नगरसेवक पदासाठी विश्वास शिनगारे यांचे नाव चर्चेत ; पक्षाचा युवा चेहरा म्हणून नावलौकिक**



**बीड । प्रतिनिधी**

धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धारूर तालुक्यात राजकीय चर्चांना वेग आला आहे. नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नगराध्यक्षपदाचा चेहरा कोणी यासाठी चर्चा होऊ लागली आहे याचबरोबर धारूर शहरात अजून एका प्रभागाची चर्चा होऊ लागली आहे तो प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक ९ ज्यामध्ये समाजसेवा व पक्ष कार्यातून उदयास युवा चेहरा आलेल्या विश्वास शिनगारे यांचे नाव चर्चेत आले आहे. विश्वास शिनगारे या गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शिवभक्त प्रतिष्ठानच्या माध्यमातून राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध होण्यासाठी कबड्डी स्पर्धा,विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, कोविड काळात लसीकरण शिबिर, तिरंगा झेंड्याचे वाटप,पक्षकार्यात, आंदोलनात,विविध निवडणुकात सक्रिय युवा चेहरा आणि समाजहिताच्या कामांमुळे त्यांची ओळख पक्षाचा युवा चेहरा म्हणून झाली आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील तजनतेच्या प्रश्नांवर ठामपणे भूमिका घेणारे आणि न्याय मिळवून देणारे नेतृत्व आवश्यक आहे. राजकारणासोबतच समाजसेवा करण्याचा त्यांचा उद्देश फक्त लोकहित हाच आहे, सामाजिक सेवेतून सुरुवात करून राजकारणात नवा अध्याय लिहिण्याची त्यांची तयारी सुरू असल्याचे समजते. त्यांच्या जनसंपर्काची पद्धत, कार्यतत्परता आणि प्रामाणिक दृष्टिकोन यामुळे प्रभाग क्रमांक ९ मधील जनतेत त्यांच्याविषयी सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील मतदारवर्गातही चर्चा सुरू आहे की अशा युवा चेहऱ्याने प्रभाग क्रमांक ९ चे नेतृत्व करावे. पक्ष नेतृत्व स्वच्छ प्रतिमा असलेल्या व पक्षाचा युवा चेहरा म्हणून सर्वपरिचित असलेल्या विश्वास शिनगारे यांना निवडणूक लढण्याची संधी देणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### वाळू माफियाकडून २० हजारांची लाच घेतांना हवालदार पकडला

**बीड । प्रतिनिधी**

कुठलेही टेंडर नसताना खुलेआम अवैध वाळू उपसा केला जात आहे. याप्रकरणी सातत्याने बातम्या प्रकाशित केल्यानंतरही महसूल आणि पोलीस प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. त्यातच वाळूमाफियाला दाखल गुन्ह्यात सहकार्य करण्यासाठी तब्बल ३० हजाराच्या लाचेची मागणी करण्यात आली. तडजोडअंती २० हजाराची लाच स्विकारताना शनिवारी (दि.८) गेवराई पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदारास बीड एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. विजय आघाव असे लाचखोर पोलीस हवालदाराचे नाव आहे. ते गेवराई पोलीस ठाण्यात कार्यरत होते. येथे दाखल असलेल्या वाळू चोरीच्या गुन्ह्यात वाळू माफियाला सहकार्य करण्यासाठी अघावने ३० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडअंती २० हजाराची लाच स्विकारतांना बीड एसीबीने रंगेहाथ पकडले. ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले

# गेवराई भाजपाचा शिवाजीनगर मधील बुरुज ढासळला

## पवारांचे खंदे समर्थक विठ्ठल पवार व समाधान मस्के राष्ट्रवादीत ढेरे दाखल

**गेवराई । प्रतिनिधी**

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहिर होताच गेवराई भाजपाला मोठी गळती लागली आहे, लक्ष्मण पवारांचे खंदे समर्थक म्हणुन ओळख असलेले माजी नगरसेवक विठ्ठल पवार आणि समाधान मस्के या दोहोंनी त्यांच्या असंख्य समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. एकेकाळी भाजपाचा अभेद्य बुरुज अशी ओळख असलेल्या शिवाजीनगर मध्ये भाजपाला खिंडार पडुन भाजपाचा शिवाजीनगर बुरुज ढासळला असल्याची चर्चा गेवराई शहरात सुरु आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वात झालेल्या प्रवेश सोहळ्याला शिवाजीनगर भागातील नागरीक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. विजयसिंह पंडित यांनी समाधान मस्के व त्यांच्या समर्थकांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत केले आहे.

गेवराई नगर परिषद निवडणुकीच्या पहिल्या टप्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये जोरदार



इनकमिंग सुरु झाले आहे. शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी शिवाजीनगर भागात माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे कट्टर समर्थक म्हणुन ओळख असलेले समाधान मस्के यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. आमदार विजयसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी व्यासपिठावर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शहराध्यक्ष दिपक आतकरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजा, दादासाहेब घोडके, सरपंच शितल साखरे, शितल धोंडरे, बंडुसेठ मोटे यांच्या मान्यवर उपस्थित होते. याच परिसरात माजी नगरसेवक विठ्ठल पवार आणि त्यांच्या समर्थकांनी दोन दिवसापुर्वी प्रवेश केला होता. त्यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. दोन ▶ उर्वरित पान २ वर

## महानुभव पंथासाठी स्मशानभूमीची जागा उपलब्ध समाजाने मानले आ.सुरेश धस यांचे आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील महानुभव पंथीयांच्या गेल्या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला अखेर यश आले असून आ.सुरेश धस यांनी यासाठी पुढाकार घेत महानुभव पंथाच्या अनुयायांसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची जागा उपलब्ध करून दिली आहे. या निर्णयामुळे पंथातील अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झाल्याने स्थानिक



नागरिकांनी आणि पंथीय बांधवांनी आ.धस यांचे मनःपूर्वक आभार मानले यावेळी महानुभव गीता आश्रम आष्टी, संचालिका तपस्विनी कांताबाई धाराशिवकर ,महानुभव आश्रम चिखली संचालक प. पु.प. म. उद्धव राज धाराशिवकर, श्री निशिकांत गरगडे, मुकुंद गरगडे, सुभाष गरगडे, भूषण गरगडे, चक्रधर गरगडे, अमोल गरगडे, निलेश गरगडे, स्वप्निल गरगडे, श्री कृष्णा गरगडे, श्री ज्ञानदेव सोनवणे, श्री प्रशांत तळेकर, श्री विशाल निराळे, श्री सुधीर अष्टेकर, श्री मधुकर मेहेरकर, श्री प्रवीण मेहेरकर, श्री राजाभाऊ भोज, श्री गंगाधर मल्ले, श्री विशाल सेठी, श्री निलेश सोनवणे, श्री पवन सोनवणे, व इतर साधुसंत आणि महानुभाव पंथीय समाज बांधवांनी आभार मानले.



*कपिलधार :- बीड पासून जवळ असलेली कपिलधारवाडी या ठिकाणी संपूर्ण रस्ता व गावातील घरे ढासळली असल्याने संपूर्ण गावाचे नुकसान झाले आहे. कपिलधार जाण्यासाठी तो रस्ता बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे नागरिकांनी मांजरसुमबा मार्गे जावे. (जनहितार्थ.)*

## लेखक परमेश्वर बनकर लिखित संत सावता महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे बीड येथे प्रकाशन मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन



**पाटोदा । प्रतिनिधी**

संत परंपरेचा संदेश,भक्तीचा आदर्श आणि समाज परिवर्तनाचा दीप प्रज्वलित करणारे संत शिरोमणी सावता महाराज यांचे जीवन हे प्रेरणादायी आदर्शाचे प्रतीक आहे. या महान संतांच्या कार्याचा आणि जीवन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून लेखक परमेश्वर बनकर यांनी त्यांच्या चरित्रावर आधारित एक मूल्यवान पुस्तक लिहिले आहे.या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल गोल्डन चॉईस येथे सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यात संत सावता महाराजांचे वंशज ह. भ. प. रविकांत महाराज वसेकर (अरण) यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून, हा कार्यक्रम संत परंपरेतील एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.या प्रसंगी साहित्य, समाजसेवा आणि संत परंपरेशी निगडित अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात संत परंपरेवर आधारित विचारमंथन, भक्तिगीते, तसेच लेखकास सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा कार्यक्रमही होणार आहे.लेखक परमेश्वर बनकर यांनी या पुस्तकातून सावता ▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरातील मोकाट कुत्र्यांचा व मोकाट रस्त्याने फिरणाऱ्या जनावरांचा सी ओ साहेब बंदोबस्त करा... अन्यथा बीड नगरपालिकेत मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे आणून सोडू

### नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेला कर्तव्यदक्ष लाभलेले सी ओ साहेब आपण एकदा बीड शहरांमध्ये सर्वत्र फिरून चक्कर मारून या नंतर आपल्याला समजेल की नेमकं बीड शहरांमध्ये नेमकं चालले आहे तरी काय बीड शहरांमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य नाल्या कोंडलेले आहेत व्यवस्थित नाहीत ठीक ठिकाणी पाईपलाईन फुटलेली आहे कुठे कुठे तर पाईपलाईन मध्ये मेलेले कुत्रे आढळतात हे मागच्या काही महिन्यापूर्वी दिसून आले आणि घाण कचरा देखील मोठे मोठे ढिगारे बीड शहरामध्ये ठीक ठिकाणी दिसून येत आहेत बीड नगर प्रशासनाला हे दिसत नाहीत का असा प्रश्न देखील आता बीड शहरातील नागरिकांना पडला आहे तसेच मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून तसेच मोकाट जनावर देखील बीड ▶ उर्वरित पान २ वर

## गाळ्यात आढळली कोटींची चारचाकी व मशिनरी ! गाळा मालक चकित ! महागडी गाडी कुटेची असल्याची चर्चा, बीड ग्रामीण पोलिसांचा तपास सुरु

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरा नजीक बहिरवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती समिती परिसरात असलेल्या एका गाळ्यामध्ये कोटी रुपयांची महागडी चारचाकी गाडी आणि मशिनरी आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या गाळ्यातील गाडी व मालाबाबत गाळा मालकाला काहीच माहिती नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. बहिरवाडी भागात बाजार समिती मधील गाळा क्रमांक १०९ चे गाळा मालकानी बऱ्याच दिवसांनी आपला गाळा(गोडाऊन) उघडण्यासाठी गेला असता लॉकमध्ये चावी लागत नसल्याने त्याने अनेक प्रयत्न करून देखील लॉक उघडत नसल्याने ग्लेंडर कटरने लॉक तोडले. शटर उघडून आत पाहिले असता त्याला आत एक चारचाकी गाडी आणि विविध मशिनरी, यंत्रसामग्री व कपडे ठेवलेली दिसल्याने हा प्रकार पाहून तो चकित झाला.

गाळा मालकाने तत्काळ बीड ग्रामीण पोलिसांना याबाबाद माहिती देत घडलेला प्रकार सांगून लेखी अर्ज सादर केला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन गाळ्याची पाहणी केली. प्राथमिक तपासात चारचाकी गाडीची किंमत सुमारे एक कोटी रुपयांच्या आसपास असल्याचे समोर आले आहे. गाडीमध्ये काही कपडे व साड्याही असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. बीड ग्रामीण पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज यांनी मोंढा परिसरात जाऊन गाळ्याची तपासणी केली. त्या ठिकाणाचा पंचनामा केला या गाडीचा आणि मशिनरीचा मालक कोण, तसेच गाळा मालकाच्या परवानगीशिवाय हे सर्व साहित्य गाळ्यात का व कोणी ठेवले ?याचा तपास पोलिस करत आहेत.तसेच ही गाडी एखाद्या गुन्ह्यात वापर झाला आहे का ? यासाठी तपास पोलीस करत आहेत या घटनेमुळे बाजार समिती परिसरात मोठी चर्चा सुरू असून, ही चारचाकी गाडी कुणाची आणि ▶ उर्वरित पान २ वर

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपकडून निरीक्षकांची नियुक्त्य

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश नेतृत्वाच्या सूचनेनुसार तसेच लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे आणि मा. खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षातर्फे इच्छुक उमेदवार तसेच विविध विधानसभा क्षेत्रांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठका जिल्हाध्यक्ष शंकररावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच आयोजित केल्या जाणार आहेत. या बैठकीदरम्यान संबंधित इच्छुक उमेदवारांचे अर्जही भरून घेतले जाणार असल्याची माहिती गणेश लांडे, जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी बीड यांनी दिली आहे. बैठकांचे नियोजन प्रभावी आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावे, तसेच प्रत्येक विधानसभा ▶ उर्वरित पान २ वर

# सर्व्हेक्षण पथक येणार असल्याने झोपी गेलेले बीड आगार जागे झाले

**बसस्थानकातील स्वच्छतेच्या कामाला लागले ; नियमित बसस्थानक स्वच्छ राहणार का ? : डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नव्या मध्यवर्ती बसस्थानकातील अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची वानवा, पत्र्याच्या शेडमधील बंद शौचालये, बंद अवस्थेतील पथदिवे आणि पावसाळ्यात छताला होणारी गळती या कारणांमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.



गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी थेट पालकमंत्री अजितदादा पवार आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना लेखी तक्रार देत आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, राज्य परिवहन महामंडळातर्फे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यात येत आहे. बीड विभागातील ‘ब’ आणि ‘क’ वर्ग बसस्थानकांचे तिसरे सर्व्हेक्षण १० ते २१ नोव्हेंबरदरम्यान होणार असून, नाशिक येथील मुल्यांकन समिती हे सर्व्हेक्षण करणार आहे.

या पार्श्वभूमीवर, एरव्ही झोपी गेलेले बीड आगार प्रशासन आता जागे झाले असून स्थानक परिसराची धूळ झटकण्यासाठी स्वच्छतेच्या कामाला लागले आहे. स्वच्छतागृहांची सखोल साफसफाई, परिसरातील गवत काढणे आणि पथदिव्यांची दुरुस्ती अशी कामे गतीने सुरू आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

## रेकॉर्डवरील तीन गुन्हेगारांना केले बीड जिल्ह्यातून हद्दपार



**बीड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे पेठ बीड ठाणे हददीमध्ये राहणारे निखील किरण धारु रा. वतारवेस पेठ बीड शेख अखतर शेख रशीद रा. अचानक नगर पेठ बीड बालाजी सुनिल गुणवंत रा. भोई गल्ली पेठ बीड या तिघांवर पोलीस ठाणे पेठ बीड येथे विविध कलमान्वये गुन्हे दाखल असुन त्यांच्यावर प्रतिबंधक कार्यवाही करुन सुदधा त्यांच्या वर्तणुकीमध्ये बदल झाला नाही. ▶ उर्वरित पान २ वर